महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १६० किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१६५९ : छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास स्वामी यांची भेट.

१९३२ : नाशिकच्या काळाराम मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवण्याचा आदेश देण्यात आला.

१८९६ : प्रसिध्द राजकीय नेते व थोर सामाजिक कार्यकर्ते केशवराव जेधे यांचा जन्म.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७८,५२०.३० | +२६.७६ (०.०३४%) |
| डॉलर | ₹ ९३.०८ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २६ |
| दिल्ली | ३९ | २५ |
| मुंबई | ३७ | २६ |
| नागपूर | ४० | २५ |
| पुणे | ३७ | २१ |

**सुविचार**

आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा वेध घ्या, कदर करा. प्रगतीचा विचार करा-कारण, एकदा गेलेला क्षण परत येत नाही.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:०४ संध्या-६:४८

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५६,९१०/- २,७५,०००/-

# चोपड्यात खळबळ! धरणगाव नाक्याजवळ दगडाने ठेचून तरुणाची हत्या

## खिशातील लग्नपत्रिकेमुळे तारामती नगरातील प्रदीप माळी यांची ओळख पटली

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील नारायणवाडी परिसरातील धरणगाव नाक्याजवळ सोमवारी सकाळी एका ४० ते ४५ वर्षीय व्यक्तीचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. अज्ञात व्यक्तींनी दगडाने ठेचून त्याची हत्या केल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. भरवस्तीच्या जवळच घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

मृत व्यक्तीची सुरुवातीला ओळख पटत नव्हती. त्यामुळे पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र मृतदेहाची झडती घेतली असता त्याच्या खिशात एक लग्नपत्रिका आढळून आली. त्या पत्रिकेवरील पत्ता आणि माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असता, सदर मृतदेह तारामती नगर येथील रहिवासी प्रदीप राजू माळी (वय अंदाजे ४०-४५) यांचा असल्याचे निष्पन्न झाले.



घटनेची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांनी घटनास्थळी धाव घेत तपासाच्या सूचना दिल्या. तसेच जळगाव येथून फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. या पथकाने घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा केले असून खुनामागील कारणांचा तपास सुरू आहे. अतिरिक्त पोलिस अधीक्षक कविता नेरकर यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला असून त्या सध्या चोपड्यात ठाण मांडून आहेत.

प्रदीप माळी हा कष्टाळू युवक असून त्याने यापूर्वी किराणा दुकान व जिनमध्ये काम केले होते. सध्या तो पानटपरी चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. रविवारी रात्री तो हुडको कॉलनी परिसरातून दोन जणांसोबत बाहेर गेल्याची माहिती समोर येत आहे. त्यानंतर त्याचा मृतदेह आढळून आल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

या प्रकरणी एक संशयित पोलिसांच्या ताब्यात असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, आरोपींना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला असून न्याय न मिळाल्यास ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून पोलिस तपास वेगाने सुरू आहे.

**थोडक्यात**

### सोशल मीडियावरील बेकायदेशीर मजकुरावर निवडणूक आयोगाची कारवाई

**मुंबई ।** देशातील सार्वत्रिक निवडणुका व पोटनिवडणुका २०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरील बेकायदेशीर व दिशाभूल करणाऱ्या मजकुराविरुद्ध कडक भूमिका घेतली आहे. सर्व संबंधितांनी सोशल मीडियाचा जबाबदारीने व नैतिकतेने वापर करावा, असे आयोगाने सांगितले आहे. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००, आयटी नियम २०२१ आणि आचारसंहितेच्या तरतुदींचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तयार केलेला किंवा फेरफार केलेला कोणताही भ्रामक अथवा बेकायदेशीर मजकूर निदर्शनास आल्यानंतर संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मनी ३ तासांच्या आत कारवाई करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



### मनिपुरात मशाल रॅली हिंसाचारात २१ जणांना अटक

**मणिपूर ।** येथे शटडाउन सुरू असताना रविवारी रात्री अनेक ठिकाणी निदर्शने करण्यात आली. इंफाळ पूर्वमधील कोइरेंगेई, इंफाळ पश्चिममधील उरिपोक आणि काकचिंग जिल्ह्यात मशाल रॅली करण्यात आली.काकचिंगमध्ये निदर्शक आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. गर्दी पांगवण्यासाठी सुरक्षा दलांनी अश्रुधूर, स्मोक बॉम्ब आणि स्टन ग्रेनेडचा वापर केला. निदर्शकांनी दगडफेक केली. या चकमकीत अनेक जण जखमी झाले, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ६ एप्रिल रोजी ट्रोंगलाओबी आवांग लेइकाई येथील एका घरावर झालेल्या बॉम्बस्फोटात दोन मुलांचा मृत्यू झाला होता. यांच्या न्यायासाठी निदर्शने सुरू आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी रॅपिड ॲक्शन फोर्स तैनात करण्यात आली.

# संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सज्ज : मुख्यमंत्री

## ● राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी घेतली बैठक

वृत्तसंस्था । मुंबई


**संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी, प्रभावी अंमलबजावणी आणि समन्वयाच्या माध्यमातून या आपत्तीचे सौम्यीकरण करण्यात यावे. यासाठी सर्व विभागांनी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**





संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषि, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांच्यासह कृषी, मदत व पुनर्वसन, वित्त, जलसंपदा, जलसंधारण, भारतीय हवामानशास्त्र विभाग, वित्त व नियोजन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभाग पूर्णपणे सज्ज




भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवण्याची शक्यता असून पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी राहील, मात्र उष्णतेच्या लाटा अधिक प्रमाणात येण्याची शक्यता वर्तविण्यात आली. दरम्यान, पॉझिटिव्ह आयओडी विकसित झाल्यास एल निनोच्या परिणामांची तीव्रता काही प्रमाणात कमी होऊ शकते, असेही यावेळी सांगण्यात आले.

**जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजनांचीकामे तातडीने करावी**

यासाठी जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार या योजनांची कामे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या कामांसाठी वित्त विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच जुन्या जल स्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. यामुळे कमी पैशात जास्त पाणी साठा उपलब्ध होईल. कमी पावसाच्या परिस्थितीतही सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणारी हीच साधने प्रभावी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. 'जी रामजी योजने'तून होणारी (पान २ वर)

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, २०१५ मध्ये पावसाळा संपल्यानंतर राज्यातील पाणीसाठा केवळ ४५ टक्के होता, मात्र सध्या पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तितका साठा उपलब्ध आहे. त्यामुळे योग्य नियोजन केल्यास राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल. २०१५ मधील एल निनोच्या कालावधीतील अनुभवावरून २०१८ या वर्षी उपाययोजना केल्यामुळे पिके वाचविता आली. एल निनोच्या कालावधीत पावसातील अनियमिततेमुळे विशेषतः मराठवाड्यात मोठा परिणाम दिसून आला होता. दोन पावसाच्या सरींमध्ये दीर्घ खंड पडल्यास पिकांवर ताण येतो, मात्र संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून पिकांचे नुकसान कमी करता येते. त्यामुळे जलसंधारण व पाणी साठवण क्षमतेत वाढ करणे अत्यावश्यक आहे.**

## आजपासून बेमुदत संपावर

# प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांचा एल्गार

वृत्तसंस्था । नाशिक

**विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उद्या, मंगळवारपासून (दि. २१) बेमुदत संपावर जाणार आहेत. या संपात नाशिकसह राज्यभरातील सुमारे १७ लाख कर्मचारी सहभागी होणार असल्याने प्रशासकीय कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे.**



कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकारसमवेत वारंवार चर्चा करूनही त्यावर ठोस निर्णय होऊ शकलेला नाही. सन २०२३ मधील आंदोलनानंतर सरकारने काही आश्वासने दिली. परंतु, त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे उद्यापासून हा बेमुदत संप सुरू होणार असून, त्याचा परिणाम महसूल, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम, जिल्हाधिकारी कार्यालये, पंचायत समित्या, शाळा, महाविद्यालये तसेच रुग्णालयांतील प्रशासकीय सेवांवर होण्याची शक्यता आहे. आज, सोमवारी तोडगा निघाला (पान २ वर)

# प्रवाशांनी भरलेली बस दरीत कोसळली, २१ जणांचा मृत्यू

## जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात भल्या पहाटे घडली घटना

वृत्तसंस्था । उधमपूर

**जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात सोमवारी सकाळी एक भीषण रस्ते अपघात झाला. प्रवाशांनी भरलेली बस डोंगरावरून खोल दरीत कोसळल्याने किमान २१ जणांचा मृत्यू झाला असून २९ जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी १० वाजता रामनगर भागातील कागोर्त गावाजवळ बस एका धोकादायक वळणावर असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट दरीत कोसळली. स्थानिक नागरिकांनी तातडीने बचावकार्य सुरू करत जखमींना ढिगाऱ्याखालून बाहेर काढले. त्यानंतर पोलीस आणि आपत्कालीन पथकांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून उधमपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. गंभीर जखमींना तातडीने उपचारासाठी एअरलिफ्ट करण्याची व्यवस्था केली जात आहे, असे त्यांनी सोशल मीडियाद्वारे सांगितले. ही बस एका दुर्गम गावातून उधमपूरकडे जात असताना हा भीषण (पान २ वर)

# खतांचा काळाबाजार करणाऱ्यांचे विक्री परवाने होतील रद्द

## कृषी सहसंचालक सुभाष काटकर यांनी जिल्हास्तरीय बैठकीत दिला इशारा

वृत्तसंस्था । मालेगाव

**खरीप हंगाम २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना खतांचा पुरवठा सुरळीत व्हावा आणि अनधिकृत साठेबाजीला चाप बसावा यासाठी कृषी विभाग आता 'ॲक्शन मोड'मध्ये आला आहे. यासंदर्भात कृषी विभागाने मालेगाव येथे खत उत्पादक कंपनी प्रतिनिधी व घाऊक विक्रेत्यांची जिल्हास्तरीय बैठक घेतली. बैठकीत विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर यांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांना थेट परवाना रद्द करण्याचा इशारा दिला आहे.**



युरिया,डीएपी यासारख्या रासायनिक खतांची वाहने कंपनीकडून गोदामात पोहोचताच खत वितरकांनी कृषी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच ती खाली करणे बंधनकारक आहे. तसेच, खते प्राप्त होताच आयएफएमएस प्रणालीवर तात्काळ ङ्गअॅक्नॉलेजमेंटफ (पोचपावती) देणे अनिवार्य आहे. जर,या ऑनलाईन प्रणालीत दिरंगाई झाली किंवा व्यवहारात पारदर्शकता नसल्याचे आढळले, तर संबंधित विक्रेत्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा काटकर यांनी यावेळी दिला.

**विक्रेत्यांसाठी कडक नियमावली**

रासायनिक खतांची विक्री करण्यासंदर्भात कृषी विभागाने विक्रेत्यांना काही बंधने घालून दिली आहेत. त्यानुसार खतांची सर्व विक्री केवळ ई-पॉस मशीनद्वारेच करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. तसेच एका शेतकऱ्याला २० पेक्षा जास्त युरिया गोण्यांची विक्री केल्यास त्या शेतकऱ्याची प्रत्यक्ष तपासणी केली जाऊ शकते.या तपासणीत गैरप्रकार आढळून आल्यास संबंधित विक्रेत्यावर परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. रासायनिक खतांच्या दराबाबत पारदर्शकता असावी,या दृष्टीने देखील खबरदारी घेण्यात येणार आहे. एमआरपीपेक्षा जादा दराने खत विक्री, लिंकिंग अर्थात युरिया-डीएपी यासारख्या खतांसोबत इतर औषधे घेणे सक्तीचे करणे किंवा साठेबाजी यावर कृषी विभागातर्फे लक्ष देण्यात येणार आहे. तसे आढळल्यास संबंधित विक्रेत्यांचा परवाना रद्द केला जाईल, असा इशारा बैठकीत देण्यात आला. (पान २ वर)

### जपानमध्ये ७.४ रिश्टर स्केलचा भीषण भूकंप; त्सुनामीचा इशारा

वृत्तसंस्था । टोकियो

**उत्तर जपानमध्ये सोमवारी भूकंपाचे धक्के जाणवले. या भागात ७.४ रिश्टर स्केलचा हादरा जाणवल्याची माहिती समोर आली आहे. जपानच्या हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, या भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा देण्यात आला असून, तीन मीटर उंच (१० फूट) लाटांची शक्यता वर्तवली आहे.**

समोर आलेल्या माहितीनुसार, भूकंपाचा धक्का एवढा तीव्र होता की, टोकियोमध्ये अनेक इमारतींना हादरा बसला असून, कत्येक किलोमीटर लांब याचा प्रभाव दिसून आला. भूकंपाचे हादरे जाणवल्यानंतर सुमारे ४० मिनिटांनी ८० सेंटीमीटर (३१ इंच) उंच लाटा इवाटे येथील कुजी बंदराला धडकल्या, अशी माहिती जपान हवामान विभागाने माहिती प्रसिद्ध केली आहे. यानंतर प्रशासनाने किनाऱ्या जवळील नागरिकांना या ठिकाणावरुन लांब जाण्याचे आवाहन केले आहे. (पान २ वर)

## संपादकीय

### रक्तदात्यांची संख्या वाढली पाहिजे

तुमच्या रक्तदानामुळे कुणाचा तरी जीव वाचू शकतो, ही भावनाच मनाला आनंदीत करून जाते. रक्तदानाबाबत असलेले काही गैरसमज दूर करून रक्तदात्यांची संख्या वाढली पाहिजे.लंडनमधील फ्रान्सिस क्रिक इन्स्टिट्युटच्या नवीन संशोधनानुसार, वारंवार रक्तदान करणाऱ्यांना सूक्ष्म अनुवांशिक बदलांचा अनुभव येऊ शकतो. त्यामुळे त्यांना रक्ताचा कर्करोग होण्याचा धोका कमी होऊ शकतो. यासह, वाढत्या प्रमाणातील पुराव्यांवरून नियमित रक्तदानामुळे अनेक आरोग्यविषयक फायदे मिळू शकतात. जसजसे आपले वय वाढते तसतसे आपल्या रक्त तयार करणाऱ्या स्टेम पेशी नैसर्गिकरित्या उत्परिवर्तन करतात, ही प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. यापैकी काही उत्परिवर्तनांमुळे रक्ताच्या कर्करोगासारख्या रोगांचा धोका वाढतो. फ्रान्सिस क्रिक इन्स्टिट्युटच्या नवीन अभ्यासानुसार, ६० वर्षे वयाच्या निरोगी पुरुष रक्तदात्यांच्या दोन गटांची तुलना केली गेली. एका गटाने ४० वर्षे वर्षातून तीन वेळा रक्तदान केले होते, तर दुसऱ्या गटाने ४० वर्षांत एकूण पाच वेळाच रक्तदान केले होते. दोन्ही गटांमध्ये अनुवांशिक उत्परिवर्तनांची संख्या समान होती, परंतु त्यांचे स्वरूप भिन्न होते. वारंवार रक्तदान करणाऱ्यांपैकी जवळजवळ ५० टक्के लोकांमध्ये कर्करोगाशी संबंधित नसलेल्या विशिष्ट प्रकारच्या उत्परिवर्तनाचे प्रमाण होते, तर केवळ ५ वेळा रक्तदान करणाऱ्यांपैकी फक्त ३० टक्के लोकांमध्ये हे प्रमाण आढळून आले. असे मानले जाते की नियमित रक्तदान शरीराला फ्रेश रक्त पेशी तयार करण्यास प्रोत्साहित करते, ज्यामुळे स्टेम पेशींचे अनुवांशिक परिदृश्य फायदेशीर मार्गाने बदलते. प्रयोगशाळेतील प्रयोगांमध्ये, हे उत्परिवर्तन सामान्यत: रक्ताच्या कर्करोगाशी संबंधित उत्परिवर्तनांपेक्षा वेगळे होते. जेव्हा उंदरांमध्ये इंजेक्शन दिले गेले तेव्हा वारंवार रक्तदात्यांच्या स्टेम पेशी लाल रक्तपेशी तयार करण्यात अधिक कार्यक्षम होत्या. हे निष्कर्ष आशादायक आहेत. रक्तदान केल्याने रक्तातील कर्करोगाचा धोका कमी होतो की नाही हे निर्धारित करण्यासाठी पुढील संशोधनाची आवश्यकता आहे. प्रत्येक वेळी जेव्हा एखादी व्यक्ती रक्तदान करते, तेव्हा त्या व्यक्तीचे शरीर गमावलेल्या रक्त पेशींची जागा घेण्याची प्रक्रिया त्वरित सुरू करते. त्यामुळे अस्थिमज्जाला नवीन पेशी तयार करण्यासाठी चालना मिळते. ही नैसर्गिक नूतनीकरण प्रक्रिया कालांतराने निरोगी, अधिक लवचिक रक्त पेशी निर्माण करण्यास मदत करते. काही पुरावे असेही सुचवतात की वारंवार रक्तदानामुळे इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारू शकते, त्याचप्रमाणे टाइप २ मधुमेहाचा धोका कमी करण्यात भूमिका बजावते. याबाबतीतसुद्धा संशोधन चालू आहे. काही शास्त्रज्ञांनी रक्तदान आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य यांच्यातील संभाव्य संबंधाबद्दल अनुमान केले आहे. हृदयरोगाच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण म्हणजे रक्ताचा चिकटपणा- रक्त किती जाड किंवा पातळ आहे. जेव्हा रक्त खूप जाड असते, तेव्हा ते कमी कार्यक्षमतेने वाहते, ज्यामुळे रक्तात गुठळ्या, उच्च रक्तदाब आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. नियमित रक्तदानामुळे रक्ताचा चिकटपणा कमी होण्यास मदत होते आणि रक्त पातळ होते. ज्यामुळे हृदयाला पंप करणे सोपे होते आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी गुंतागुंत होण्याचा धोका कमी होतो. हृदयाचे कार्य सुधारते. रक्तदानामुळे शरीरातील लोहाची पातळी नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते. लोह हा हृदयरोगाशी संबंधित आणखी एक घटक आहे. रक्तातील ऑक्सिजनच्या वहनासाठी लोह आवश्यक असले तरी, जास्त प्रमाणात लोह साठणे हानिकारक आहे. रक्तदानाद्वारे लोह कमी केल्याने, दात्यांना लोहाशी संबंधित गुंतागुंतींचा धोका कमी होऊ शकतो. काही तज्ज्ञांनी, विशेषतः उच्च रक्तदाब असलेल्या लोकांमध्ये, रक्तदान आणि कमी रक्तदाब यांच्यातील संबंध देखील सुचवला आहे.

# शेतकरी-व्यापाऱ्यांसाठी मूलभूत सुविधांना प्राधान्य देणार

## शहादा बाजार समितीत आठ कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी । शहादा



**येथील कृषी उत्पन्न बाजार समिती बाजार समितीवर अवलंबून असणाऱ्या सर्वच घटकांच्या हितासाठी विविध उपक्रम राबवत असून त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. या उपक्रमांमुळे सर्वच घटकांचा आत्मविश्वास वाढला असून बाजार समितीचे हे प्रयत्न भविष्यातही शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील यांनी केले.**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात स्वनिधी अंतर्गत बाजार समितीतील मुख्य रस्ते व रिकाम्या जागी काँक्रिटीकरण असे सुमारे आठ कोटी रुपयांच्या कामांचा भूमिपूजन सोहळा सभापती अभिजीत पाटील, व्यापारी व शेतकऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास बाजार समितीचे उपसभापती सत्यानंद पाटील, संचालक दिलीप पाटील, भानुदास पाटील, डॉ. सुरेश नाईक, जगदीश पाटील, मोतीलाल जैन, रुपेश जैन, जिवन भिल, रवींद्र पाटील, मोहनसिंग गिरासे, माधव पाटील, विलास पाटील, दगडू पाटील, क्रांतिगीर गोसावी, कपिल पाटील, गणेशराजे पाटील, राजेंद्र अग्रवाल, पंकज जैन, गुड्डू जैन, सुभाष गेलडा, प्रितेश जैन, निलेश जैन, वर्धमान गेलडा, अक्षय गेलडा, प्रदीप जैन, यशवंत पाटील, कपिल पाटील, सचिव हेमंत पाटील यांच्यासह व्यापारी, शेतकरी, हमाल मापारी बांधव, कर्मचारी उपस्थित होते. सभापती अभिजीत पाटील पुढे म्हणाले की, शेतकरी व्यापारी व बाजार समितीत येणाऱ्या लोकांची सोय व्हावी म्हणून बाजार समितीत विविध विकास कामे सुरू आहेत. त्यात अजून भर पडावी म्हणून मार्केट यार्ड ते स्टेट बँक पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे काँक्रिटीकरण तसेच बाजार समितीत येणाऱ्या वाहनांची सोय व्हावी म्हणून लोडिंग अनलोडिंग एरिया तसेच सुमारे दीड एकर जागेवर काँक्रिटकरण करण्याचा कामाचे भूमिपूजन करण्यात आले. येणाऱ्या काळात अधिक प्रभावीपणे काम करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात झालेल्या भूमीपूजनप्रसंगी संचालक मंडळ, व्यापारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वन्यजीव तस्करी प्रकरणातील सहा जणांना वन कोठडी



प्रतिनिधी । नवापूर

**परिसरात उघडकीस आलेल्या वन्यजीव तस्करी प्रकरणात वनविभागाने आतापर्यंत सहा आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणातील पहिल्या टप्प्यात अटक करण्यात आलेल्या पाच आरोपींना दि. १६ रोजी प्रथम वर्गन्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यांना २१ एप्रिलपर्यंत वन कोठडी सुनावण्यात आली आहे. तपासादरम्यान महत्त्वाची माहिती समोर आल्यानंतर दि. १७ एप्रिल रोजी आणखी एक आरोपी अनिलभाई गंभीरभाई वसवा याला अटक करण्यात आली.**

त्यानंतर दि. १८ एप्रिल २०२६ रोजी त्याला देखील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने ेठे जाळे उघडकीस येण्याची शक्यता त्याला दि.२१ एप्रिल २०२६ पर्यंत वर्तवली जात असून आरोपींकडून वन कोठडी सुनावून तपासासाठी महत्त्वपूर्ण धागेदोरे मिळण्याची अपेक्षा आहे. वनविभागाकडून या गुन्ह्याच्या सर्व बाजूंनी तपास करण्यात येत असून इतर जिल्ह्यांशी किंवा राज्यांशी संबंध आहेत का, याचाही शोध घेतला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास सहाय्यक वन संरक्षक (प्रा. व वन्यजीव) नंदुरबार रोशन बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून वनपरिक्षेत्र अधिकारी नवापूर अमोल काशीकर हे तपासाची सूत्रे हाताळत आहेत. वनविभागाच्या या कारवाईमुळे वन्यजीव संरक्षणाबाबत कडक संदेश दिला गेला आहे. वनविभागाच्या ताब्यात दिले आहे.

# गुडघे -खांदयांच्या रुग्णांसाठी आज सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पियुष वसईकर उपलब्ध

प्रतिनिधी । अमळनेर

**अमळनेर तालुक्यातील रुग्णांसाठी आता मोठा दिलासा मिळाला असून गुडघा, खांदा,मणका तसेच हाडांच्या विविध आजारांवर व संधिवातावर तज्ज्ञ उपचारांची सुविधा अमळनेर मध्ये उपलब्ध झाली असून प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पियुष सुरेश वसईकर यांची सेवा दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी उपलब्ध असणार आहे.**

आज दि.२१ एप्रिल २०२६ रोजी मंगळवारी डॉ. वसईकर अमळनेर मध्ये उपलब्ध आहेत. आर्थोस्कोपी व कृत्रिम सांधेरोपण (जॉईंट रिप्लेसमेंट) क्षेत्रातील विशेष प्राविण्य असलेले डॉ. वसईकर हे गुडघ्यातील सतत वेदना, चालताना त्रास, जिना चढताना अडचण, सांधे लॉक होणे, खांद्याची हालचाल करताना वेदना तसेच संधिवात यांसारख्या आजारांवर तपासणी व अत्याधुनिक उपचार करणार आहेत. रुग्णांकरिता ही सुविधा धन्वंतरी हॉस्पिटल तसेच दीपक मेडिकल, धुळे रोड, अमळनेर येथे उपलब्ध आहे. तरी नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन दीपक मेडिकलच्या संचालकांनी केले आहे.

# अक्षय्यतृतीयाला वाहन, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू खरेदी

## धुळ्यात ५० कोटींवर उलाढाल; दर गगनाला भिडल्याने सराफ बाजारात वर्दळ कमी

प्रतिनिधी । धुळे

**साडेतीन मुहूर्तपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीया सणाला धुळेकरांनी खरेदी केली. दुचाकी, चारचाकी वाहनांसह फोर के टीव्ही, डबल डोअर फ्रिज, एसी, मोबाईल अशा वस्तू खरेदीस नागरिकांनी प्राधान्य दिले. काहींनी गृहप्रवेश करत शुभमुहूर्त साधला. मात्र सोन्याचे दर गगनाला भिडल्यामुळे सराफ बाजारात अपेक्षित वर्दळ नव्हती. एकूणच दिवसभरात शहरात ५० ते ५५ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज आहे.**



दुचाकींचा जोर, कारलाही प्रतिसाद शहरात चारशेहून अधिक दुचाकींची विक्री झाली असून, इलेक्ट्रीक दुचाकींचाही चांगला प्रतिसाद मिळाला. सुमारे ५० ते ५५ चारचाकी वाहनांची खरेदी झाली. नागरिकांनी आधीच टेस्ट ड्राइव्ह व बुकिंग करून ठेवले होते. वाहन विक्रेत्यांच्या शोरूममध्ये दिवसभर ग्राहकांची चांगली वर्दळ होती. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंनाही पसंती गृहउपयोगी वस्तूंमध्ये फोर के टीव्ही, एसी, कुलर, फ्रिज, मोबाईल यांची खरेदी मोठ्या प्रमाणावर झाली. उन्हाच्या झळांमुळे कुलर आणि एसीच्या विक्रीत वाढ झाली. अनेकांनी ऑफरचा फायदा घेत खरेदी केली. सराफ बाजारात वर्दळ कमीच अक्षय्य तृतीया म्हटली की सोनं खरेदी हा अपरिहार्य भाग असतो. मात्र यंदा दहा ग्रॅम शुद्ध सोन्याचा दर वाढल्याने अनेकांनी सोनं खरेदी टाळली. जीएसटीसह दर आणखी वाढल्याने ग्राहक संभ्रमात होते. नेहमी १० ग्रॅम घेणारे पाच ग्रॅमवर, तर २ ग्रॅम घेणारे फक्त एक ग्रॅमवर समाधान मानताना दिसले. आंबा आणि पुरणपोळीचा नैवेद्य-अक्षय्य तृतीया म्हणजे पुरणपोळी आणि आमरसचे जेवन असते. यासाठी काल सायंकाळपासून आंबे, घागर आणि डांगर घेण्यासाठी झुंबड उडाली होती. बदाम आंबा १०० ते १२० रुपये, केशन आंबा १५० ते १८० किलो दराने विकला गेला. खापरावरची विकतची पुरणपोळी ७० रुपयांना विकली जात होती. घराघरांत पुर्वजांच्या नावाने घागर भरून नैवेद्य दाखवण्यात आला.

## पान १ वरुन

### संभाव्य एल निनोच्या......

जलयुक्त शिवारची कामे योग्य प्रकारे झाली आहेत की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच जी रामजी मधून जास्तीत जास्त कामे मिळवण्यासाठी टास्क फोर्स तयार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले. संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभाग पूर्णपणे सज्ज- संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभाग पूर्णपणे सज्ज असून शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्यात येत असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज, बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, पर्यावरण विभागाचे सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन सचिव एन रामास्वामी, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव माणिक गुरसाळ, राज्य आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण, भारतीय हवामान शास्त्र विभागाचे अतिरिक्त महासंचालक साई कृष्णन आदींसह उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थानचे संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक, आयमेट वेदर सर्व्हिसेसचे संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र संचालक उपस्थित होते.

### खतांचा काळाबाजार करणाऱ्यांचे......

'अॅक्नॉलेजमेंट'चे महत्व काय? - अनेकदा खतांचा साठा ऑनलाइन प्रणालीच्या बाहेर ठेवून काळाबाजार केला जातो. हे रोखण्यासाठी ङ्गअॅक्नॉलेजमेंटफप्रक्रिया महत्त्वाची आहे. खत कंपनीकडून माल मिळाल्यावर विक्रेत्याने सरकारी पोर्टलवर मालाची पोहोच नोंदवणे म्हणजेच अॅक्नॉलेजमेंट. यामुळे प्रत्येक गोणीचा मागोवा घेता येतो आणि साठा अधिकृतपणे विक्रीसाठी उपलब्ध होतो. शेतकऱ्यांनी खते खरेदी करताना नेहमी पक्के बिल घ्यावे. कोणत्याही प्रकारची फसवणूक, जादा दराची आकारणी किंवा साठेबाजी दिसून आल्यास शेतकऱ्यांनी ७८२१० ३२४०८ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर किंवा स्थानिक कृषी कार्यालयात तक्रार करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने,उपविभागीय कृषी अधिकारी संदीप मेढे, विभागीय गुण नियंत्रण निरीक्षक उल्हास ठाकूर, मालेगावचे तालुका कृषी अधिकारी भगवान गोरडे, येवला तालुका कृषी अधिकारी शुभम बेरड यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या प्रारंभी बागलाण पंचायत समितीचे कृषी अधिकारी किरण शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

### प्रवाशांनी भरलेली बस......

अपघात घडला. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले तीव्र दुःख - जम्मू-काश्मीरच्या उधमपूरमधील भीषण बस अपघाताबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली. या अपघातात २१ जणांचा मृत्यू झाला असून पंतप्रधानांनी मृतांना श्रद्धांजली वाहत जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना केली.

### प्रलंबित मागण्यांसाठी......

नाही तर उद्यापासून संप अटळ आहे. वाहनचालकांचाही सहभाग - शासकीय वाहनचालकांच्या भरतीवर घालण्यात आलेली बंदी आणि चौथ्या वेतन आयोगापासून सातव्या वेतन आयोगापर्यंत न्याय मिळालेला नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेची राज्य शासकीय व जिल्हा परिषद वाहन चालक वर्ग ३ कर्मचारी संघटना या संपात सामील झाल्याची माहिती अध्यक्ष योगेश गोळेसर दिली. शिक्षण मंडळाचे कर्मचारी आजपासून संपावर - माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयातील कर्मचारी आजपासून (दि. २०) बेमुदत संपावर जाणार आहेत. विभागीय मंडळातील कर्मचारी संघटना आणि बहुजन कर्मचारी कल्याण महासंघाने असा इशारा दिला असून, याचा परिणाम दहावी-बारावीच्या पेपर तपासणीवर होण्याची शक्यता आहे.

### जपानमध्ये ७.४ रिश्टर स्केलचा......

किनारी भागातील नागरिक आणि नदीजवळील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. जमिनीवरुन उंच असणाऱ्या आणि बचावकार्य करण्यास सोपे असणाऱ्या ठिकाणी नागरिकांना आश्रय घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. त्सुनामीच्या उंच लाटांमुळे नुकसानाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे. त्सुनामीचा धोका लक्षात घेता नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत सुरक्षित ठिकाणे सोडू नयेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# नगरसेवक प्रकाश महाजन यांच्या प्रयत्नातून स्मशानभूमीत पाण्याची सुविधा!

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील मोठा माळी वाडा परिसरातील स्मशानभूमीत मूलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. विशेषत: पाण्याच्या टाकीची कोणतीही उपलब्धता नसल्याने अंतिम विधी करताना अडचणी निर्माण होत होत्या.**

या गंभीर परिस्थितीची दखल घेत प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक प्रकाश भगवान महाजन यांनी पुढाकार घेत नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. नगरसेवक महाजन यांनी कोणत्याही शासकीय प्रक्रियेची वाट न पाहता स्वखर्चातून स्मशानभूमीत मोठ्या क्षमतेची प्लास्टिक पाण्याची टाकी उपलब्ध करून दिली. या माध्यमातून अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक पाणी सहज उपलब्ध होऊ लागले आहे. त्यांच्या या कृतीमुळे स्मशानभूमीतील दीर्घकाळापासून जाणवत असलेली



पाण्याचा टाकीची कमतरता दूर झाली आहे. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी स्वच्छता आणि पाण्याची व्यवस्था ही अत्यंत आवश्यक बाब असते. अंत्यविधीसाठी पाण्याची टाकी उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना आता दिलासा मिळाला आहे. या सुविधेमुळे अंत्यसंस्कार प्रक्रिया अधिक सुलभ आणि सन्मानपूर्वक पार पाडता येत आहे. स्थानिक नागरिकांनी नगरसेवक प्रकाश महाजन यांच्या या तत्परतेचे आणि सामाजिक जाणिवेचे कौतुक करत अभिनंदन केले आहे.

## शिक्षण विभागाचा अजब कारभार...!

# एक मुख्याध्यापक पदासाठी दोन जणांकडे सोपवला पदभार

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील ग्रामविकास शिक्षण संस्था, मुडीच्या संचलित कै. दादासाहेब विनायकराव झिपरू पाटील हायस्कूल, शिरूड येथील मुख्याध्यापक पदाच्या मान्यतेवरून प्रशासकीय पेच निर्माण झाल्याचे दिसते. शिक्षण विभागाने एकाच पदासाठी एकाच कालावधीत दोन वेगवेगळ्या व्यक्तींना मान्यता दिली आणि सर्वांना अचंबित केले आहे. संस्थेचे याबाबत तहयात संचालक रमेश विनायकराव पाटील यांनी शिक्षण विभागाकडे तक्रार केली आहे.**




तक्रारदार रमेश पाटील यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जळगाव आणि शिक्षण उपसंचालक, नाशिक यांच्याकडे दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक आर. ए. शिंदे हे दि.२८ फेब्रुवारी २०२४ रोजी निवृत्त झाले. त्यानंतर रिक्त पदावर श्रीमती सविता बबनराव बोरसे यांना १ मार्च २०२४ ते ३१ मे २०२४ या कालावधीसाठी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून स्वाक्षरीचे अधिकार देण्यात आले होते. मात्र, त्याचवेळी शिक्षण विभागाने याच कालावधीसाठी अनिल शिवाजी सूर्यवंशी यांनाही नियमित मुख्याध्यापक म्हणून मान्यता प्रदान केली आहे. एकाच प्रस्तावाच्या आधारे (प्रस्ताव क्र. ३२६) दोन परस्परविरोधी आदेश निर्गमित होणे हे प्रशासकीय नियमांचे उल्लंघन असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे.

संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी बनावट दस्तऐवज आणि खोटा अजेंडा तयार करून प्रशासनाची दिशाभूल केली. या कालावधीत दुहेरी मान्यता देणे हे महाराष्ट्र शिक्षण सेवा नियमांचे उघड उल्लंघन आहे. संस्थेचे मूळ दप्तर कायदेशीररीत्या आपल्याकडे असतानाही विरोधकांनी बनावट दप्तर तयार करून व्यवहार केल्याचा आरोप रमेश पाटील यांनी केला आहे. त्यांनी मुख्याध्यापक पदाची दुहेरी मान्यता तात्काळ रद्द करण्यात यावी. बनावट प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्था अध्यक्ष व सचिवांची सखोल चौकशी व्हावी. या प्रकरणाची तातडीने सुनावणी लावून दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करावी. या संदर्भात शिक्षण विभागाने दखल न घेतल्यास न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही रमेश पाटील यांनी दिला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांची कानळदा येथे अचानक भेट

## प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायतीची केली पाहणी

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी सोमवार दि. २० एप्रिल रोजी जळगाव तालुक्यातील कानळदा गावास अचानक भेट देत तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी तसेच ग्रामपंचायत कार्यालयाची पाहणी केली.**



मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सीईओ करिश्मा नायर यांनी जिल्ह्यातील विविध विभाग व संस्थांच्या प्रत्यक्ष भेटीद्वारे आढावा घेण्यास सुरुवात केली असून, त्याच अनुषंगाने त्यांनी कानळदा येथे अचानक भेट देत स्थानिक प्रशासनाच्या कामकाजाची माहिती घेतली. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पाहणीदरम्यान त्यांनी रुग्णांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचा आढावा घेतला. ग्रामस्थांना दर्जेदार, वेळेवर व समाधानकारक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यास कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. औषधसाठा, स्वच्छता, कर्मचाऱ्यांना सूचना करीत रुग्णसेवा यावर विशेष भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यानंतर त्यांनी जि.प. शाळा व अंगणवाडीला भेट देत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत माहिती घेतली. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा, पोषण आहार, शैक्षणिक साहित्य व परिसरातील स्वच्छतेची पाहणी केली. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध व्हावे, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.ग्रामपंचायत कार्यालयाच्या भेटीदरम्यान त्यांनी सरपंच, ग्रामसेवक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला

# महादेव मंदिर सभामंडपाचे आ. किशोर पाटील यांच्याहस्ते भूमिपूजन

प्रतिनिधी । पाचोरा

**पाचोरा तालुक्यातील बाळद बु. येथे अक्षय्य तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर बाळदेश्वर महादेव मंदिराचा जीर्णोद्धार व सभामंडप बांधकाम भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे भूमिपूजन आमदार किशोर पाटील यांच्या शुभहस्ते विधिवत पध्दतीने करण्यात आले.**



यावेळी मंत्रोच्चार, पूजा-अर्चा आणि पारंपरिक विधींसह कार्यक्रमाची सुरुवात झाली. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार बनले. या प्रसंगी माजी जि.प.सदस्य तथा शिवसेना जिल्हाप्रमुख रावसाहेब पाटील, माजी नगरसेवक शितल सोमवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी मंदिर विकासाबाबत आपले मनोगत व्यक्त करताना, सभामंडपाच्या बांधकामामुळे भक्तांसाठी अधिक सोयी-सुविधा उपलब्ध होतील आणि धार्मिक कार्यक्रम अधिक भव्य स्वरूपात आयोजित करता येतील. तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने आणि लोकप्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमामुळे गावाच्या धार्मिक व सांस्कृतिक विकासाला निश्चितच चालना मिळणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थांनी व मंदिर समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### गावठी कट्ट्यासह सराईत गुन्हेगाराला अटक

**नशिराबाद ।** गावात बस स्टॅण्ड परिसरात गावठी कट्टा बाळगून दहशत माजवणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. नशिराबाद बसस्टॅण्ड परिसरात कमलाकर महाजन हा सराईत आरोपी स्वतः कडे कट्टा बाळगून दहशत निर्माण करत असल्याची गुप्त माहिती सहायक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांना १९ एप्रिल रोजी मिळाली. या माहितीची खातरजमा करून सपोनि नारखेडे यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. पोलिसांच्या पथकाने सापळा रचून रात्री ७:३० वाजेच्या सुमारास कमलाकर महाजन याच्यावर छापा टाकून त्याला जागीच पकडले. कमलाकर प्रभाकर महाजन (वय ३६, रा. वरची अळी, नशिराबाद, ता. जि. जळगाव) या संशयित आरोपीच्या ताब्यातून गावठी कट्टा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी नशिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### डॉ.महेश्वर रेड्डी यांची पुण्याला बदली

**जळगाव ।** जळगाव पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांची पुणे गुन्हे शाखेच्या अधीक्षकपदी बदली झाली आहे. भारतीय पोलीस सेवेतील नऊ अधीक्षक, उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या सोमवारी गृह विभागाने बदल्या केल्या असून त्यात जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या पोलीस अधीक्षकपदावर धुळ्याचे डॅशिंग पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील नऊ अधीक्षकांच्या बदल्या शासनाचे सहसचिव सुग्रीव धपाटे यांनी बदल्या केल्या आहेत. जळगावचे पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांची पुणे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षकपदी बदली करण्यात आली आहे.

# मुकुंद सपकाळे यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ आंदोलन



प्रतिनिधी । जळगाव

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मुकूंद सपकाळे यांच्यावर दि. ११ एप्रिल रोजी झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ विविध संघटनांच्यावतीने महिला असोसिएशनच्या अध्यक्षा वासंती दिघे, मराठा सेवा संघाचे सुरेंद्र पाटील, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव प्रा.प्रीतीलाल पवार, वैशाली झाल्टे, अयाज अली, जनक्रांती मोर्चाचे सुरेश तायडे, राष्ट्रवादीच्या प्रतिभा शिरसाठ, संध्या तायडे, संविधान जागरच्या सरोजिनी लभाणे, बहुजन क्रांती मोर्चाचे सुनील देहडे, लोकसंघर्ष मोर्चाचे सचिन धांडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करून हल्लेखोराला मोक्का लावून तात्काळ अटक करा,अशा घोषणा देण्यात आल्या.**

जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात मुख्य आरोपी विशाल राजू अहिरे व इतर आरोपी साथीदार घटना घडून दीर्घ कालावधी होवून देखील अटक झालेली नाही. आरोपीवर गंभीर गुन्हे असल्याने सामाजिक सलोखा बिघडण्याची दाट शक्यता असून त्यास तत्काळ अटक करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निदर्शन आंदोलनप्रसंगी अजय पाटील, भारती रंधे, सुमित्र अहिरे, जयसिंग वाघ, माजी नगरसेवक राजू मोरे, प्रतिभा घोडेस्वार, ज्योती दाभाडे, काजल वाघ, कलाबाई वाघ, संजय सपकाळे, साहेबराव वानखेडे, सुष्मिता भालेराव, ॲड.राजेश गोयर, ॲड. आनंद कोचुरे, आनंदा तायडे, श्रीकांत बाविस्कर, दिलीप सपकाळे, सुजाता इंगळे, डॉ. प्रकाश वानखेडे, देवानंद निकम, महेंद्र केदार, कुसुम सोनवणे, जगदीश सपकाळे, बापू सोनवणे, नारायण सोनवणे, सतीश गायकवाड, राजू सपकाळे, विनोद अढागंळे, सतीश सुर्वे, वाल्मीक जाधव, चेतन नन्नवरे, रवींद्र तायडे, मोनू अडकमोल, अशोक सपकाळे, हरुन मन्सुरी, सोमा भालेराव व अनेक कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

# मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण

प्रतिनिधी । जळगाव

**ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतमालाची ने-आण सुलभ व्हावी. तसेच कापणी, मळणी व आंतरमशागत यांसारखी शेती कामे सुलभ करण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना शासनाने सुरू केली आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जळगाव येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित या प्रशिक्षणात शासन निर्णय दि. १४ डिसेंबर २०२५ मधील तरतुदींची सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रशिक्षणास जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग, सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंते उपस्थित होते. याशिवाय जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी व पंचायत समितीचे लेखा अधिकारी यांनीही सहभाग घेतला. कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे तसेच उपजिल्हाधिकारी (रोहयो) मंजुषा घाटगे उपस्थित होते. प्रशिक्षणाचे मार्गदर्शन उपविभागीय अधिकारी, फैजपूर बबन काकडे यांनी केले. शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोर पालन करून मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी यांनी केले. तसेच या योजनेसंदर्भातील तांत्रिक प्रशिक्षण लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी दिली.

# किरकोळ कारणावरुन तरुणावर तलवारीने हल्ला

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील मेहरूण परिसरातील अक्सानगरमध्ये भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एका २५ वर्षीय तरुणावर तलवारीने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेख इस्माईल शेख असगर (वय २५, रा. छोटी मिल्लत शाळेजवळ, अक्सा नगर, मेहरूण, जळगाव) असे जखमी तरुणाचे नाव आहे. इस्माईल हा मजुरी करून पोट भरतो. दि. १८ एप्रिल रोजी रात्री ८:३० ते ९ वाजेच्या सुमारास अक्सानगरमधील छोटी मिल्लत शाळेजवळ असलेल्या नाल्यापाशी इस्माईलचा मित्र अल्तमश आणि संशयित आरोपींमध्ये भांडण सुरू होते. हे भांडण सोडवण्यासाठी इस्माईल मध्यस्थी करत असताना, आरोपींनी संतापून त्याच्यावर हल्ला चढवला. आरोपी शाहबाज उर्फ नगीना याने इस्माईलला जीवे मारण्याच्या उद्देशाने तलवारीने जोरदार वार केला.

# संघर्षातून स्वाभिमानाकडे : सरला परदेशी यांची प्रेरणादायी वाटचाल



प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरातील आदर्श नगर, गणपती नगर परिसरात ई रिक्षेमधून भाजीपाला विक्री करणाऱ्या सरला परदेशी आज अनेक महिलांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. कष्ट, जिद्द आणि स्वाभिमान यांच्या जोरावर त्यांनी आपला व्यवसाय केवळ टिकवला नाही, तर तो नव्या उंचीवर नेला आहे.**

पूर्वी लोटगाडी ढकलत भाजी विकणाऱ्या सरला ताईंना रोजच्या उदरनिर्वाहासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागत होती. उन्हाळा, पाऊस किंवा थंडी, कुठल्याही परिस्थितीत त्यांनी कधीही हार मानली नाही. मात्र, त्यांच्या या जिद्दीला योग्य दिशा मिळाली ती मराठी प्रतिष्ठानच्या पुढाकारातून. मराठी प्रतिष्ठानच्या महिला सबलीकरण उपक्रमांतर्गत सरला ताईंना ई-रिक्षा उपलब्ध करून देण्यात आली. यासाठी राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्जाची सोय करण्यात आली. तसेच शासकीय योजनेंतर्गत सबसिडीचे प्रकरण पूर्ण करण्यात आले. एवढेच नव्हे, तर आरटीओ मार्फत ई-कार्ट चालवण्यासाठी आवश्यक असलेले परवाने (लायसन्स) देखील मिळवून देण्यात आले. या सर्व प्रक्रियेमुळे सरला ताईंच्या व्यवसायाला नवे बळ मिळाले. आज सरलाताई आत्मविश्वासाने ई-रिक्षा चालवत शहरात भाजीपाला विक्री करतात.

जळगाव शहरात ई-रिक्षा चालवून भाजी विक्री करणारी पहिली महिला म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. आज सरलाताई भाजीपाला घ्यायला जात असतानाचा व्हिडिओ पाहायला मिळतो, ज्यामध्ये त्यांच्या कामाप्रती असलेली तळमळ आणि नियमितपणा स्पष्टपणे दिसून येतो. पहाटेपासूनच बाजारात जाऊन ताज्या भाजीपाल्याची निवड करताना त्यांचा आत्मविश्वास आणि मेहनत प्रत्येकाला प्रेरणा देणारी आहे.

हा व्हिडिओ त्यांच्या प्रवासाची खरी झलक दाखवणारा असून, स्वतःच्या पायावर उभं राहण्याची ताकद काय असते याचं जिवंत उदाहरण आहे. त्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि डोळ्यांतील समाधान सांगून जाते की, संधी मिळाली तर महिला कोणतीही उंची गाठू शकतात.

सरला ताईंचा प्रवास हा केवळ आर्थिक उन्नतीचा नाही, तर सामाजिक सन्मान आणि स्वाभिमान मिळवण्याचा आहे. मराठी प्रतिष्ठानतर्फे राबवली जाणारी ही महिला सबलीकरण मोहीम अनेक गरजू महिलांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सरला ताईंसारख्या अनेक महिलांना स्वावलंबी बनवण्याचा हा प्रयत्न समाजासाठी अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी आहे. त्यांची ही वाटचाल अनेक महिलांना नव्या उभारीची प्रेरणा देणारी ठरो, हीच अपेक्षा. सरला ताई परदेशी यांना मनः पूर्वक सलाम.

# श्री स्वामिनारायण मंदिरात अक्षयतृतीयानिमित्त घागर भरणी उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**श्री स्वामिनारायण मंदिर, जळगाव येथे अक्षयतृतीया निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात घागर भरणी कार्यक्रम पार पडला. सुमारे (२५०९)पंचवीसशेहून अधिक घागरी भक्तांनी श्रद्धेने भरल्या. या दिवशी पितृमोक्षासाठी विशेष महत्त्व असल्याने, उपस्थित भाविकांनी आपल्या पितरांचे स्मरण करून तर्पण केले. प्रत्येकाने आपल्या पितरांची नावे घेत गोत्रोच्चार केला आणि पवित्र ब्राह्मण व संतांच्या मार्गदर्शनाखाली विधिपूर्वक घागर भरणी केली.**



अक्षयतृतीया हा सनातन धर्मातील अत्यंत पवित्र आणि शुभ दिवस मानला जातो. या दिवशी केलेले दान, जप, तप, यज्ञ व पुण्यकर्म अक्षय म्हणजे कधीही न संपणारे फळ देतात, अशी शास्त्रांमध्ये मान्यता आहे. भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची कृपा प्राप्त करण्यासाठी हा दिवस विशेष मानला जातो. त्यामुळेच या दिवशी पितृकार्य, अन्नदान व सेवा यांना अधिक महत्त्व दिले जाते. या पवित्र सोहळयात परमपूज्य गोविंदप्रसाददासजी स्वामी, परमपूज्य दिव्यप्रकाशदासजी स्वामी, तसेच अतुल भगत आदी संत-महंत उपस्थित होते. त्यांच्या आशीर्वादाने कार्यक्रमाला अधिक आध्यात्मिक उंची प्राप्त झाली. संतांनी उपस्थितांना अक्षयतृतीयेचे महत्त्व समजावून सांगत धर्म, सेवा आणि भक्ती यांचे महत्त्व अधोरेखित संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पडला. या उपक्रमामुळे भाविकांमध्ये आध्यात्मिक जागरूकता वाढली असून, समाजात धर्मभावना अधिक दृढ झाली आहे.

# विद्युत कंपनीच्या कामात अडथळा आनल्याप्रकरणी आरोपींना दंडाची शिक्षा

## जळगाव न्यायालयात ८ साक्षीदारांची साक्ष; न्या.आर.एन.जोशी यांचा महत्वपूर्ण निकाल

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीच्या शासकीय कामात अडथळा आणला. तसेच कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याप्रकरणी दोन आरोपींना प्रत्येकी दहा हजार दंडाची शिक्षा न्या.आर. एन.जोशी यांनी सुनावली.**

दि. २९ जानेवारी २०२० रोजी विद्युत सहा. नमो सोनकांबळे, गणेश शेंडे व सुरज कोयताळे असे किनोद गावातून विज बिज वसुली करीत जात असतांना फुपणी रोडवरील अस्तानगरी कमानजवळ आरोपी समाधान कोळी व शशिकांत सोनवणे यांनी विज वितरण कंपनीच्या लघुदाब वाहीनीवर आकडे टाकुन वीज चोरी करत होते. परंतु लाईटचा फॉल्ट झाल्याने त्यांचा आकडा निघाला होता. त्यानंतर त्यांना पुन्हा आकडा टाकणे असल्याने त्यांनी विद्युत सहा. नमो सोनकांबळे यांना लाइन बंद करण्याबाबत सांगितले. परंतु, सोनकांबळे यांनी लाईन बंद केली नाही याचा राग येवुन दोन्ही आरोपींनी फिर्यादी नमो सोनकांबळे यांचा रस्ता अडवुन त्यांना शिवीगाळ करुन समाधानने नमो सोनकांबळे यांच्या कपाळावर व तोंडावर हाताने मारहाण केली.

गणेश शेंडे व सुरज कोयताळे यांना आरोपी शशिकांत सोनवणे याने छातीवर बुक्का मारुन ते करत असलेल्या शासकिय कामात अडथळा निर्माण केल्यामुळे त्यांनी जळगांव तालुका पो. स्टे. येथे दोन्ही आरोपींविरुध्द गु.र.क. २१/२०२० भा. द.वि. कलम ३५३, ३४१, ३३२, ५०४, ५०६ सह कसम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदरचा खटला क. २२४/२०२२ हा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन. जोशी यांच्या न्यायालयात सुनावणीकामी आल्यानंतर सरकारपक्षातर्फे एकुण ८ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सदर खटल्यात फिर्यादी, जख्मी साक्षीदार व त्यांचे सहकारी यांच्या साक्षी महत्वपूर्ण ठरल्या. तसेच त्यास पुरक पुरावा म्हणुन वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष महत्वपूर्ण ठरली. यात मे. न्यायालयाने सरकारपक्षाचा पुरावा व सरकारी वकीलांचा प्रभावी युक्तीवाद ग्राहय धरून आरोपीना भा.दं.वि कलम ३५३. ३३२ सह ३४ खाली दोषी धरुन केलेल्या गुन्ह्यात आरोपींना प्रोबेशन ऑफ ऑफेंडरर्स ॲक्ट कलम ४ प्रमाणे चांगल्या वर्तवणुकीच्या जातमुचलक्यावर दोन वर्षासाठी प्रत्येकी रक्कम रु १०,००० अटी व शर्तीवर सोडण्यात आले. आरोपींनी कुठल्याही गुन्हयात सहभागी होऊ नये. दोन वर्षे त्यांनी शांतता व चांगली वर्तवणूक ठेवावी. कुठल्याही प्रकारच्या नशेपासुन दूर रहावे. प्रोबेशन ऑफिसरच्या दिलेल्या सूचनेप्रमाणे पालन करावे. तसेच आरोपी क. १ व २ यांनी प्रत्येकी रुपये १० हजार रुपये दंड आणि नुकसान भरपाई म्हणून दयायचे आहे. त्यापैकी रुपये ५ हजार प्रत्येकी नमो सोनकांबळे आणि जख्मी गणेश शेंडे यांना दयावे व तशी पोहच घ्यावी. तसेच रुपये ५,०००/- महाराष्ट्र विद्युत कंपनी यांच्या कर्मचारी युनियन यांच्या फंडात जमा करावी व उरलेली रुपये ५,०००/- सरकार जमा करावी,असा निकाल न्या.आर.एन.जोशी यांनी दिला. सरकारपक्षातर्फे सहा. सरकारी वकील भारती ज. खडसे यांनी कामकाज पाहिले. पैरवी अधिकारी राजु सैंदाणे यांनी सरकारपक्षास सहकार्य केले.

# सिमला उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त केलेल्या गायी शेतकऱ्यांना दत्तक द्याव्यात

## शेतकरी कृती समितीची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**प्रतिनिधी । चोपडा**

गो माता शेतकरीच वाचवू शकतो, यासाठी सिमला उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही व्हावी व जप्त केलेल्या अधिकच्या गायी शेतकऱ्यांना दत्तक देऊन शेती व देश समृद्ध करावी, अशी मागणी शेतकरी कृती समितीने निवेदन देऊन तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे केली.



निवेदनातून त्यांनी म्हटले आहे की, आज देशभर गोरक्षक जीवाची बाजी लावून गो माता वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांचे प्रयत्नांस मदत करणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. शेतकरीच गाय वाचवू शकतो परंतु तो आर्थिक मेटाकुटीला आल्याने व दिवसाला गाय पाळणेचा खर्च उचलणेदेखील त्याला शक्य होत नाही हे मत सर्विस्तर अभ्यास करून सिमला उच्च न्यायालयाने भारतीय गोवंश संरक्षण संवर्धन परिषद, हिमाचल प्रदेश यांनी दाखल केलेल्या याचिका क्र.सीडब्ल्यूपी ६६३१/२०१४ चे निकाल पत्रात मांडले आहे. केंद्र व राज्य सरकार यांना आदेश दिले की, शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर आधारित (एमएसपी) द्या व ते जोपर्यंत होत नाही तोपर्यंत भावांतर योजना लागू करून शेतकऱ्यांना न्याय द्या. विशेष म्हणजे यात शेतमाल फक्त कडधान्य न धरता नाशवंत म्हणजेच भाजीपालासह १०५पिकांसाठी लागू करावा, असे निर्देश देखील दिले. यात कोणताही शेतकरी याचिकाकर्ता नव्हता. तरी न्यायालयाने स्वतःहून गायी पाळणे शेतकऱ्यांना शक्य व्हावे, यासाठी हे सांगितलं.

यासाठी कृती समितीने त्या गायींना पाळण्यास जे शेतकरी तयार असतील त्यांना दत्तक द्याव्यात. त्यांचा विमा दत्तक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी काढावा व जर गाय वारली तर तो पैसा गोशाळांसाठी वापरावा. याने गाय माता ही वाचेल व शेतकऱ्यांना खत देखील मिळत राहील. या योजनेत जसे अनुभव येतील तशा सुधारणा करता येतील. परंतु गोशाळेवरील ताण कमी करण्यासाठी व शेती समृद्ध होण्यासाठी कायदा करावा, असे निवेदन आज एस.बी. पाटील , डॉ. रवींद्र निकम, अजित पाटील, मोहन पाटील, शाळीग्राम करंकाळ, प्रा प्रदीप पाटील, कुलदीपसिंग पाटील, यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवण्यासाठी तहसीलदार भाऊसाहेब थोरात यांना दिले.

● महाराष्ट्र सरकारने हे करावे

कीटकनाशक व भरमसाठ प्रमाणात रासायनिक खतांचा वापर देखील थांबेल व प्रत्येक एका घराआड कॅन्सर, हृदयरोग, मधुमेह किंवा त्यापेक्षाही घातक आजाराचा किमान एकतरी रुग्ण आहे हे चित्र थांबेल. गोरक्षक खूप मेहनत घेऊन गायी वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत.परंतु एवढ्या मेहनतीने पकडलेल्या गायी गोशाळेत पाठवल्या जात आहेत. त्या साऱ्यांची देखभाल करताना गोशाळा चालकांना खूप त्रास होतो. कारण गोशाळांचा खर्च भागवणे खूप जिकिरीचे आहे. त्यामुळे राज्यातील बऱ्याच गोशाळेतील गायी ह्या फारच वाईट अवस्थेत असतात हे वास्तव नाकारता येत नाही.

## थोडक्यात

### करगाव शिवारातून सात बकऱ्या चोरीस

**चाळीसगाव ।** तालुक्यातील करगाव येथील एका शेतकऱ्याच्या शेतात बांधलेल्या ३५ हजार रुपये किमतीच्या सात बकऱ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या आहेत. याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की महारू वामन मुलमुले,( वय-५०,) धंदा-शेती, रा. करगाव, ता. चाळीसगाव, यांनी दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ०५. सुमारास करगाव गावाजवळील वडगाव रोडलगत असलेल्या एकूण २५ बकऱ्या नेहमीप्रमाणे बंदिस्त शेडमध्ये मोकळ्या सोडून कुलूप लावून निघून गेले होते, आज रोजी सकाळी ते ६ वा. सुमारास पुन्हा बकरीशेड येथे गेलो असता, त्यावेळी तेथे कुलूप तोडलेले दिसले.

### रावेर येथे बारागाडे उत्साहात संपन्न

**रावेर ।** येथील पारंपरिक बारागाडे ओढण्याचा सोहळा अक्षय तृतीया निमित्त मोठ्या उत्साहात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत आणि धार्मिक वातावरणात बारागाडे ओढण्यात आले. या सोहळ्यात मुख्य भगत म्हणून बाळू महाजन यांनी मानाची भूमिका पार पाडली. त्यांना किरण अस्वार आणि दीपक शिंदे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुंडलिक अप्पा महाजन, हभप कांतिलाल महाराज आणि ज्ञानेश्वर महाजन यांच्या हस्ते विधिवत पूजा करून पारंपरिक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर सर्व भगत व सहकाऱ्यांनी वाजत-गाजत मारिमाता मंदिर आणि मुंजोबा मंदिर येथे दर्शन घेऊन बारागाडे ओढण्यास सुरुवात केली.

# बेकायदेशीर गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या दोन आरोपींना अटक; स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कामगिरी!

**प्रतिनिधी । चोपडा**

**जिल्ह्यात काही समाजकंटक दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर अग्निशस्त्रांचा वापर करत असल्याच्या पार्श्वभूमीवर,पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी स्थानिक गुन्हे शाखेला अशा व्यक्तींची गोपनीय माहिती संकलित करून त्यांच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश निर्गमित केले आहेत.**

सदर आदेशाच्या अनुषंगाने, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना गोपनीय सूत्रांकडून खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, उमर्टी गावाकडून कृष्णापूर ते मामलदे मार्गे चोपड्याकडे दोन संशयित इसम एका मोटारसायकलवरून विनापरवाना गावठी पिस्तूल बाळगून दहशत माजविण्याच्या उद्देशाने येत आहेत. सदर माहितीची खातरजमा केल्यानंतर, उमर्टी गावाकडून येणाऱ्या एका संशयित मोटारसायकलला (हिरोहोंडा, काळ्या रंगाची, निळे पट्टे असलेली क्र. एमएच-१९-एस-९४५०) थांबवून त्यावरील दोन इसमांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले.अटक करण्यात आलेल्या संशयितांकडे विचारपूस केली असता, त्यांनी त्यांची नावे १) राहुल कुवरसिंग पावरा, (वय २२ वर्षे, रा.उमर्टी, ता. चोपडा, जि. जळगाव) २) गणपत प्रभाकर किर्तने, वय-२८ वर्षे, रा. असोला जवळ बाजार, ता.



औंढा नागनाथ, जि. हिंगोली) अशी सांगितली. नमुद आरोपीच्या ताब्यातून मिळालेला मुद्देमाल खालील प्रमाणे आहे. सदर आरोपींची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता, त्यांच्या ताब्यातून १ नग बेकायदेशीर गावठी बनावटीचे पिस्तूल,५ नग जिवंत काडतुसे,१ मोटार सायकल (हिरोहोंडा क्र. एमएच-१९-एस-९४५०) आणि २ नग मोबाईल फोन असा एकूण रु. ६९,०००/- (एकोणसत्तर हजार रुपये मात्र) अंदाजित किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

विनापरवाना, बेकायदेशीररीत्या दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे स्वतःच्या कब्जात बाळगल्या प्रकरणी, सदर आरोपींविरुद्ध चोपडा ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५९/२०२६, शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची उत्कृष्ट कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी आण्णासाहेब घोलप व स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वल्टे, पोलीस हवालदार विष्णू बिन्हाडे, दीपक माळी, रवींद्र पाटील, विलेश सोनवणे आणि पोलीस अंमलदार रावसाहेब पाटील सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# ओमच्या धुवांधार शतकाने 'जळगाव' कोगटा किंग

**प्रतिनिधी । जळगाव**

**जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने व रतनलाल सी. बाफना ज्वेलर्स प्रायोजित व अलरीक इलेक्ट्रीकल्स सहप्रायोजकत्वाखाली आयोजित जळगाव क्रिकेट लिग-२०२६,२० क्रिकेटमध्ये चौकार षटकारांची आतषबाजी बघायला मिळत आहे. दुसऱ्या सामन्यात जळगाव कोगटा किंगचा ओम भोसले याने धुवांधार शतक ठोकले.**




चाळीसगाव एसपीसीसी चॅलेंजच्या गोलंदाजीचा समाचार घेत त्याने ५८ चेंडूमध्ये ९ चौकार व ६ षटकार लगावत १०८ धावा करुन एकतर्फी सामना फिरवला. शनिवारी झालेल्या उद्घाटन सामन्यात उपस्थित असलेले मंत्री गिरीश महाजन, माजी मंत्री सुरेश जैन, अशोक जैन यांच्या उपस्थितीत -२६ नाणफेक झाली.

चाळीसगाव एसपीसीसी चॅलेजने नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जळगाव क्रिकेट लीगमधील सर्वाधिक महाग ठरलेल्या कर्णधार ओम मुंडे याने ४८ चेंडूत ८१ धावा केल्या. त्यात त्याने ५ चौकार व ४ षटकार लगावले. त्याला ११ चौकार व १ षटकारच्या मदतीने ८१ धावा ५८ चेंडूत करत साहिल गायकर याने उत्तम साथ दिली.

दोघांच्या जोरदार खेळीमुळे निर्धारित २० षटकात ६ गडींच्या मोबदल्यात १७६ धावा केल्यात.

जळगाव कोगटा किंग संघाने १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ओम भोसले व जितेंद्र नाईक यांनी संयम व आक्रमता दाखवित गोलदाजांवर जोरदार प्रहार केला.

शतकवीर ओम भोसले याला जितेंद्र नाईक याने ३३ चेंडूत ४१ धावा त्यात (५ चौकार व १ षटकार) करत चांगली साथ दिली. धावगतीवर कुठलाही परिणाम न होऊ देता दोघांनी एकतर्फी सामना खेचून आणला. १६.४ षटकांत १७७ धावांचे लक्ष्य दोन गड्यांच्या मोबल्यात सहज पूर्ण केले. मनिष चव्हाण याने तीन चौकारच्या मदतीने ९ चेंडूंमध्ये १६ धावा करत विजयाची औपचारिकता पूर्ण केली. चाळीसगाव चॅलेंजच्या ओम मुंडे, अमेय कोळी यांना प्रत्येकी १ गडी बाद करता आले.

**सामनावीर म्हणून ओम भोसले यांना गौरविण्यात आले. तर जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन यांच्या संकल्पनेतून मोस्ट डॉट बॉल म्हणून मेहुल इंगळे याने ४ ओव्हरमध्ये २८ धावा देत २ विकेट घेतल्याने त्याला सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी नवरंग चहाचे अमर कुकरेजा, अलरिक इलेक्ट्रिकलचे सीईओ दीपक चौधरी, वरिष्ठ व्हाईस जळगाव क्रिकेट लिगमध्ये षटकार, चौकारांची आतषबाजी प्रेसिडेंट प्रविण कुंजवाला, दाल परिवाराचे अतुल कोगटा, सागर क्रिकेट क्लबचे विजय मराठे यांची उपस्थिती होती. पंच म्हणून संदीप गांगुर्डे, संदीप चव्हाण यांनी काम पाहिले तर थर्ट अम्पायर मंगेश नार्वेकर, मॅच रेफरी म्हणून विनित कुलकर्णी यांनी काम पाहिले. जैन ड्रीम स्पेसेसच्या क्रीडांगणावर सोमवारी तीन सामने दि.२० एप्रिल सकाळी ८.३० वाजेला चाळीसगाव एसपीसीसी चॅलेन्जर्स विरूद्ध जामनेर सातपुडा हिरोज. दि.२० एप्रिल दुपारी ३ वाजेला जळगाव कोगटा किंगविरूद्ध पाचोरा एसकेटी योद्धाज. दि. २० एप्रिल सायंकाळी ७.३० वाजेला अमळनेर सुहांस जायंट्स विरुद्ध रावेर रॉयल्स.**

# वनोलीत अतिक्रमणधारकांवर कारवाई नाहीच

## सरपंच-ग्रामसेवकांवर राजकीय दबावाचा ग्रामस्थांचा आरोप

**प्रतिनिधी । यावल**





**तालुक्यातील वनोलीत अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्यास सरपंच व ग्रामसेवक असमर्थ ठरत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. राजकीय दबावापोटी ग्रामपंचायत कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याची चर्चा संपूर्ण गावात रंगली आहे.**




आजूबाजूच्या रहिवाशांनी दिलेल्या अतिक्रमण अर्जानुसार, सतीश योगराज चौधरी व विजय योगराज चौधरी यांनी गावात अनेक ठिकाणी अतिक्रमण केले आहे.

या व्यक्तींना शासकीय घरकुल मंजूर असूनही त्यांनी ते घरकुल भाड्याने दिले आहे. गावातील विविध जागांवर अतिक्रमण केले आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, या व्यक्तींचे मूळ गाव म्हैसवाडी असून तेथेही त्यांच्या नावे स्वतःचा उतारा आहे. वनोलीत आल्यानंतर त्यांनी अतिक्रमणास सुरुवात केली, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. अतिक्रमित जागेवर मोठ्याप्रमाणात आर.सी.सी. घरांचे बांधकाम केल्याचे जीओ-टॅग फोटोंमध्ये दिसून येत आहे. एकाच व्यक्तीने दोन ते तीन ठिकाणी अतिक्रमण केल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत वनोली व पंचायत समिती यावल यांच्याकडे केल्या आहेत. या विषयावर यावल तहसीलदार, पंचायत समिती गटविकास अधिकारी यावल व ग्रामपंचायत वनोली यांना अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही आतापर्यंत कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही. फक्त नोटीस पाठवत आहोत, असे उत्तर देऊनही अनेक दिवस उलटून कारवाई का होत नाही? असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. ग्रामस्थांनी जीओ-ट्रॅकिंग फोटोसह उतारे काढून पुरावा म्हणून ग्रामपंचायतीला दिले आहेत. तरीदेखील ग्रामपंचायत कारवाई करण्यास असमर्थ ठरत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

● विशेष म्हणजे, अतिक्रमणधारक वकिलामार्फत ग्रामपंचायतीला नोटीस पाठवून ग्रामपंचायतीने दिलेली नोटीस चुकीची व खोटी असल्याचे म्हणत आहेत. याचा अर्थ अतिक्रमणधारक गावातील ग्रामस्थांनाच चुकीचे ठरवत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तरीदेखील ग्रामपंचायत संबंधितांवर कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई करत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामसेवक प्रवीण चौधरी कोणत्या भीतीपोटी कारवाई करत नाहीत, तसेच सरपंच यांच्यावर काही राजकीय दबाव आहे का? असे प्रश्न ग्रामस्थांसमोर उभे राहिले आहेत. राजकीय दबावापोटीच अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्यास अधिकारी असमर्थ ठरत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. अतिक्रमणधारक ग्रामपंचायतीला जुमानत नसल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले.

# अमळनेर यात्रेतील ठेका पद्धतीला तीव्र विरोध; आंदोलनाचा इशारा

## यात्रोत्सवात ठेका पध्दतीला स्थानिक दुकानदार, पाळणेधारक, नागरिकांकडून रोष व्यक्त

**प्रतिनिधी । अमळनेर**

**नगरपरिषदेमार्फत दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या पारंपरिक यात्रेमध्ये यावर्षी ठेका पद्धती लागू करण्याच्या निर्णयाला स्थानिक दुकानदार, पाळणेधारक व नागरिकांकडून तीव्र विरोध होत आहे. याबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत हा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

दरवर्षीप्रमाणे नगरपरिषदेमार्फत थेट पावती देऊन शुल्क वसुली केली जात होती. ही पद्धत पारदर्शक व स्थानिक व्यावसायिकांच्या हिताची असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. मात्र यावर्षी ठेका पद्धतीने वसुली करण्याचा निर्णय घेतल्याने दुकानदारांवर अवाजवी आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. शोषण व भ्रष्टाचाराला वाव मिळू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच, मीना बाजार विखुरल्यास महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून असलेल्या पारंपरिक जागांवरच व्यवसाय करण्याची परवानगी देण्याची मागणीही करण्यात आली आहे. आंदोलकांनी नगरपरिषदेसमोर काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये ठेका पद्धती रद्द करून जुनी पद्धत कायम ठेवणे, मीना बाजार एकाच ठिकाणी ठेवणे व जुन्या पाळणेधारकांना त्यांच्या पारंपरिक जागांवर व्यवसाय करण्यास परवानगी देणे यांचा समावेश आहे. या मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन, धरणे व मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदा व सुव्यवस्था परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असेही स्पष्ट करण्यात आले. निवेदन देतांना देवा लांडगे (भाजप शहर सरचिटणीस), अध्यक्ष विजय राजपूत, सरचिटणीस देवा लांडगे, दिलीप ठाकूर, सुभाष पाटील, राहुल चौधरी, रमेश देव, रामभैया कलोसे,महेश संदांशिव, रवी ठाकूर, विजय विठ्ठल पाटील, मनोहर महाजन यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा

**प्रतिनिधी । भुसावळ**

औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे रविवार, दि. १९ एप्रिल रोजी राष्ट्रपिता महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धा व प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवीन मनोरंजन केंद्र, दीपनगर येथे सकाळी १० वाजता ही स्पर्धा संपन्न झाली. या कार्यक्रमात परीक्षक म्हणून के वाय सुरवाडे, शरद बोदडे, संतोष मेश्राम यांनी काम पाहिले.

चिमुकल्यांनी फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांनी भारलेली सामाजिक प्रबोधनात्मक भाषण सादर करून रसिकांच्या मनात खोलवर ठसा उमटवला.